**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

**कृपया प्रसिध्दीकरिता सादर**
**संपादक/वृत्तसंपादक**

**जनता संपर्क अधिकारी**
**बेस्ट उपक्रम**
**दूरध्वनी क्र.२२७९९३९५**

**प्रसिध्दी पत्रक क्र.२७**
**दिनांक : २९.११.२०१७**

## दि.१ डिसेंबर,२०१७ पासून 'बेस्ट'च्या बस प्रवर्तनात होणारे बदल

मुंबई, २९ : शुक्रवार, दिनांक १ डिसेंबर,२०१७ पासून बेस्ट उपक्रमाच्या बस प्रवर्तनात काही बदल करण्यात येत आहेत. यामध्ये काही बसमार्गांच्या गंतव्यस्थानात बदल होणार असून काही बसमार्गांचे परावर्तन करण्यात येत आहे.

### अतिरिक्त बसफे-यांचे प्रवर्तन

१. **बसमार्ग क्र.१७२** – भायखळा स्थानक (प) आणि प्रतिक्षानगर आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गावर वीर कोतवाल उद्यान (प्लाझा) व प्रतिक्षानगर आगार दरम्यान अतिरिक्त बसफे-या प्रवाशांच्या सोयीकरीता प्रवर्तित करण्यात येणार आहेत.

२. **बसमार्ग क्र.२९७** – बोरिवली स्थानक (पूर्व) आणि कोकणीपाडा (विस्तारीत) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गावर प्रवाशांच्या सोयीकरीता बोरिवली स्थानक (पूर्व) व मिनीनगर दरम्यान अतिरिक्त बसफे-या प्रवर्तित करण्यात येणार आहेत.

३. **बसमार्ग क्र.३१२** – प्रतिक्षानगर आगार आणि सीप्झ बसस्थानक दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गावर प्रतिक्षानगर आगार व राणी लक्ष्मीबाई चौक-सायन दरम्यान अतिरिक्त बसफे-या प्रवाशांच्या सोयीकरीता प्रवर्तित करण्यात येणार आहेत.

४. **बसमार्ग क्र.३३३** – न्यू क्वॉर्टर्स वसाहत (सहार) आणि महाकाली गुंफा दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गावर आगरकर चौक (अंधेरी-पूर्व) व महाकाली गुंफा दरम्यान अतिरिक्त बसफे-या प्रवाशांच्या सोयीकरीता प्रवर्तित करण्यात येणार आहेत.

.....२

## बसमार्गांचा / बसफे-यांचा विस्तार

१. **बसमार्ग क्र.२२०** – वांद्रे बसस्थानक (प) आणि खार स्थानक (प) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गावर निम्नलिखित ठिकाणी अतिरिक्त बसफे-या प्रवर्तित करण्यात येत होत्या.

**(अ)** वांद्रे बसस्थानक (प) आणि शेर्लीगांव

**(ब)** खार स्थानक (प) आणि शेर्लीगांव

यापैकी वांद्रे बसस्थानक (प) व शेर्लीगांव दरम्यान अतिरिक्त बसफे-यांचे प्रवर्तन वांद्रे बसस्थानक (प) येथून वांद्रे रेक्लमेशन बसस्थानकापर्यंत विस्तारीत करण्यात येत आहे. तसेच खार स्थानक (प) आणि शेर्लीगांव दरम्यान प्रवर्तित होणा-या अतिरिक्त बसफे-यांचे प्रवर्तन शेर्लीगांव येथून सहाय्यक पौलीस आयुक्त कार्यालयापर्यंत विस्तारीत करण्यात येत आहे.

२. **बसमार्ग क्र.३०३** – वांद्रे (पूर्व) बसस्थानक आणि म्हाडा बसस्थानक (मुलुंड-पूर्व) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे वांद्रे (पूर्व) बसस्थानक येथून वांद्रे टर्मिनसपर्यंत विस्तार करण्यात येत आहे.

३. **बसमार्ग क्र.३१८** - कुर्ला स्थानक (प) आणि सांताक्रुझ स्थानक (पूर्व) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गावर सांताक्रुझ स्थानक (पूर्व) व अमर ब्रास स्टील दरम्यान अतिरिक्त बसफे-या प्रवर्तित करण्यात येत होत्या. या बसफे-यांचा अमर ब्रास स्टील येथून कुर्ला आगारापर्यंत विस्तार करण्यात येत आहे.

## बसमार्गाच्या गंतव्यस्थानात बदल

१. **बसमार्ग क्र.९** – कुलाबा बसस्थानक आणि नाडकर्णी उद्यान दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे ॲन्टॉप हिल व नाडकर्णी उद्यान दरम्यान शेख मेसरी मार्गे असलेले प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग ॲन्टॉप हिल येथे समाप्त करण्यात येत आहे.

यापुढे हा बसमार्ग कुलाबा बसस्थानक आणि ॲन्टॉप हिल बसस्थानक दरम्यान प्रवर्तित होईल.

२. **बसमार्ग क्र.४४** – कुलाबा आगार आणि वरळीगांव दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे वरळीगांव येथून वरळी आगारापर्यंत विस्तार करण्यात येत आहे. तसेच डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी चौक आणि कुलाबा आगार दरम्यानचे प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी चौक (म्युझियम) येथे समाप्त करण्यात येत आहे.

यापुढे हा बसमार्ग डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी चौक (म्युझियम) आणि वरळी आगार दरम्यान प्रवर्तित होईल.

...३...

३. **<u>बसमार्ग क्र.४५</u>** – मंत्रालय आणि आणिक आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे आदर्श विद्यालय व आणिक आगार दरम्यानचे प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग 'पूर्व मुक्त' मार्गावरुन एम.एम.आर.डी.ए. वसाहत (विस्तारीत)-माहुल येथे समाप्त करण्यात येत आहे.

यापुढे हा बसमार्ग मंत्रालय आणि एम.एम.आर.डी.ए. वसाहत (विस्तारीत)-माहुल दरम्यान प्रवर्तित होईल.

४. **<u>बसमार्ग क्र.६२</u>** – मुंबई सेंट्रल आगार आणि विद्याविहार बसस्थानक दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे वीर कोतवाल उद्यान (प्लाझा) व मुंबई सेंट्रल आगार दरम्यानचे प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग वीर कोतवाल उद्यान (प्लाझा) येथे समाप्त करण्यात येत आहे.

तसेच या बसमार्गाचे कलानगर व माहीम चर्च दरम्यान धारावी 'टी' जंक्शन, रहेजा रुग्णालय, मोरी रोड मार्गे असलेले प्रवर्तन कलानगर येथून शिकागो चौक, माहीम कोळीवाडा मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

५. **<u>बसमार्ग क्र.३०२</u>** – प्रतिक्षानगर आगार आणि महाराणा प्रताप चौक (मुलुंड) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे राणी लक्ष्मीबाई चौक-सायन व प्रतिक्षानगर आगार दरम्यानचे प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग राणी लक्ष्मीबाई चौक-सायन येथे समाप्त करण्यात येत आहे.

यापुढे हा बसमार्ग राणी लक्ष्मीबाई चौक-सायन आणि महाराणा प्रताप चौक (मुलुंड) दरम्यान प्रवर्तित होईल.

६. **<u>बसमार्ग क्र.४९७ मर्या.</u>** – घाटकोपर बसस्थानक आणि लोकमान्यनगर-ठाणे दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे मुलुंड स्थानक (प) व घाटकोपर बसस्थानक दरम्यानचे प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग मुलुंड स्थानक (प) येथे समाप्त करण्यात येत आहे.

यापुढे हा बसमार्ग मुलुंड स्थानक (प) आणि लोकमान्यनगर-ठाणे दरम्यान प्रवर्तित होईल.

....४

७. **<u>बसमार्ग क्र.५३३ मर्या.</u>** – अंधेरी स्थानक (प) आणि ए.पी.एम.सी. मार्केट-सेक्टर-१९ दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे फक्त 'रविवार' दिवशीचे प्रवर्तन ए.पी.एम.सी. मार्केट-सेक्टर-१९ ऐवजी वाशी बसस्थानक येथे समाप्त करण्यात येत आहे.

यापुढे 'रविवार' दिवशी हा बसमार्ग अंधेरी स्थानक (प) आणि वाशी बसस्थानक दरम्यान प्रवर्तित होईल.

## <u>बसमार्गाचे परावर्तन</u>

१. **<u>बसमार्ग क्र.२ मर्या.</u>** – इलेक्ट्रिक हाऊस आणि आगरकर चौक दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे फक्त 'डाऊन' दिशेने सयानी मार्गावरुन परळ एस.टी. आगार मार्गे असलेले प्रवर्तन खेडेकर चौक (धनमिल नाका) मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

तसेच या बसमार्गाचे सकाळी ११.०० ते संध्याकाळी १६.०० वा. पर्यतचे प्रवर्तन आगकर चौक (अंधेरी-पूर्व) ऐवजी वांद्रे बसस्थानक (पूर्व) येथे समाप्त करण्यात येत आहे.

२. **<u>बसमार्ग क्र.१५६</u>** – सिमला हाऊस आणि भायखळा स्थानक (प) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे नाना चौक व वसंतराव नाईक चौक (ताडदेव) दरम्यान दोन्ही दिशेचे प्रवर्तन ग्रॅन्ट रोड स्थानक (प) मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

३. **<u>बसमार्ग क्र.३१८</u>** - कुर्ला स्थानक (प) आणि सांताक्रुझ स्थानक (पूर्व) दरम्यान बुध्द वसाहत व कपाडीयानगर दरम्यान स. गो. बर्वे मार्गावरुन प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे प्रवर्तन सांताक्रुझ-चेंबूर जोडमार्गावरील उड्डाणपुला मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

४. **<u>बसमार्ग क्र.३९६ मर्या.</u>** – मुलुंड (प) चेकनाका बसस्थानक आणि आगारकर चौक (अंधेरी-पूर्व) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे मुलुंड (प) चेकनाका व महर्षी अरविंद चौक दरम्यानग लाल बहादूर शास्त्री मार्गे असलेले प्रवर्तन पं. दिनदयाळ उपाध्याय मार्गाने परावर्तीत करण्यात येत आहे.

## बसमार्गाचे दुहेरी प्रवर्तन

१. **बसमार्ग क्र.२५ मर्या.** – बॅकबे आगार आणि विहार सरोवर दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे प्रवर्तन पुढीलप्रमाणे दोन टप्प्यात दोन विविध आगारातून प्रवर्तित होईल.

(अ) बॅकबे आगार ते राणी लक्ष्मीबाई चौक-सायन – (बॅकबे आगार)

(ब) वडाळा आगार ते विहार सरोवर – (वडाळा आगार)

| अ.क्र. | तपशील | बॅकबे आगार | | वडाळा आगार | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बसगाडयांची संख्या | **५ – ५ – ५ (एकमजली)** | | **६ – ६ – ६ (एकमजली)** | | |
| २. | **प्रस्थानस्थान** | पहिली बस(वेळ) | शेवटची बस(वेळ) | | पहिली बस(वेळ) | शेवटची बस(वेळ) |
| अ. | **बॅकबे आगार** | ५.०० | २०.४० | वडाळा आगार | ५.१५ | २१.३० |
| ब. | **राणी लक्ष्मीबाई चौक** | ५.४० | २१.४५ | विहार सरोवर | ६.०० | २३.०० |
| ३. | प्रवर्तनकाळ | **संपूर्ण आठवडा** | | **संपूर्ण आठवडा** | | |

## बसमार्गाचे विलिनीकरण

१. **बसमार्ग क्र.१८२** – छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मालवणी आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे प्रवर्तन राणी लक्ष्मीबाई चौक-सायन व मालवणी आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या बसमार्ग क्र.१८० मध्ये विलिन करण्यात येत आहे.

२. **बसमार्ग क्र.४३३** – विद्याविहार बसस्थानक आणि सांताक्रुझ स्थानक (पूर्व) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे प्रवर्तन विद्याविहार बसस्थानक व महंत रोड (पार्ले-पूर्व) दरम्यान प्रवर्तित होणा-या बसमार्ग क्र.३२२ मध्ये विलिन करण्यात येत आहे. तसेच बसमार्ग क्र.३२२ हा दोन्ही दिशेने सांताक्रुझ स्थानक (पूर्व) चा वळसा घेऊन प्रवर्तित होईल.

****************